# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०५/२०२५ (सोमवार)**

---

## चोरीचे दोन गुन्हे उघड, ८ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान येथे खालील प्रमाणे कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये चोरीचे २ गुन्हे नोंद आहे.

१. दिनांक २८/१२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे फिर्यादी नामे नरेंद्र सादाशिव मेश्राम, रा वार्ड क्र ३ कांद्री ,कन्हान ता. पारशिवणी यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक २७/१२/२०२४ चे रात्री ११:४५ ते दिनांक २८/१२/२०२४ चे सकाळी ०७:३० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी यांच्या शेतात ठेवलेले ६५ धानाच्या पोत्यापैकी ४० धानाचे पोते किंमती १,२०,००० /— रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अपराध क्रमांक ९३८/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

२. दिनांक ०७/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे फिर्यादी नामे फुलचंद उदासकराम कोरमारे, रा. निलज यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक ०५/०५/२०२५ चे संध्याकाळी ०७:०० ते दिनांक ०६/०५/२०२५ चे सकाळी ०६:०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी यांच्या शेतात ठेवलेले ट्रॅक्टर क्रं एम. एच. ४० एल. ५७४९ आणि त्याला जोडुन असलेली ट्रॉली क्रमांक एम. एच. ३१ एच ९४९० चोरून नेले आहे. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अपराध क्रमांक ३७१/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. दिनांक १९/०५/२०२५ रोजी स्थानिक

गुन्हे शाखेच्या पथकाला सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना गुप्तबातमीदार आणि तांत्रिक तपास करून सदर गुन्हा हा **आरोपी नामे रामप्रसाद उर्फ राजा रिक्कीराम राय, वय ३० वर्षे, रा. चिखला, तह. बदलापार जि. शिवणी. ह.मु. कापसी ,नागपुर** याने केला आहे. पोलीसांनी आरोपीला कापसी जि नागपुर येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता वर नमुद दोन्ही गुन्हे नमुद आरोपीने केले असल्याची पोलीसांना खात्री पटली. नमुद अरोपी कडुन पोलसांनी **१) उमरेड येथुन ४५ धानाचे कट्टे किंमती १,२०,००० /— रूपये २) सिहोरा जंगलातुन ट्रॅक्टर कं एम. एच. ४० एल. ५७४९ आणि त्याला जोडुन असलेली ट्रॉली क्रमांक एम. एच. ३१ एच ९४९० किंमती ७,००,०००/— रूपये असा एकुण ८,२०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



## खुन करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन मौदा:—** फिर्यादी नामे श्रीमती रंजना देवचंद मेश्राम, वय ३४ वर्ष, रा. वार्ड न ०२ वडोदा, ता. कामठी यांनी पोलीस स्टेशन मौदा येथे तोंडी रिपोर्ट दिली की, फिर्यादीचे पती मृतक नामे देवचंद महादेव मेश्राम यांना यातील आरोपी नामे १) काल्या उर्फ नितेश ज्ञानेश्वर टेकाम वय २८ वर्ष, २) विजय ज्ञानेश्वर टेकाम, वय २५ वर्षे ,दोन्ही रा. वडोदा ता. कामठी जि. नागपूर यांनी दिनांक १८/०५/२०२५ रोजी मौजा वडोदा, बाजार चौक कामठी,ता कामठी येथे मृतक याला पैशांचे देवाणघेवाणाचे कारणावरून भांडण करून त्याला मारहाण करून त्याचा खुन केला. यातील मृतक हा बांधकाम सेंट्रींग ठेकेदार होता आरोपी क्र. १ आणि २ त्याचे कडे मजुरीला होते. मृतक हा आरोपी क्र. २ याचे बाकी असलेले पैसे देत नसल्याचे कारणावरून दोन्ही आरोपीतांनी मृतकाला मारहाण करून त्याचा खुन केला असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे दोन्ही आरोपीतांविरूद्ध कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

मौदा पोलीसांनी तात्काळ दोन्ही आरोपीतांना अटक केली आहे. मा. न्यायालयाने नमुद आरोपीतांचा दिनांक २२/०५/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मध्य मंजुर केला आहे.

## सराईत गुन्हेगार आनंद रामराव बोरकर याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत राहणारा सराईत आरोपी **नामे आनंद रामराव बोरकर, वय २५ वर्षे, रा. वडविहरा , ता. काटोल** हा पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुंड असुन परीसरात गुंडगिरी करतो. लोकांना मारामारी करणे, धमकावणे, अल्पवयीन मुलीचे अपहरण,बलात्कार या सारखे अनेक गंभीर गुन्हे त्याच्या विरूध्द दाखल आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद करून त्याला अटक केले आहे. आरोपी **नामे आनंद रामराव बोरकर, वय २५**

**वर्षे, रा. वडविहरा ,ता. काटोल** याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी **नामे आनंद रामराव बोरकर, वय २५ वर्षे, रा. वडविहरा ,ता. काटोल** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली काटोल पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक १५/०५/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार **नामे आनंद रामराव बोरकर, वय २५ वर्षे, रा. वडविहरा ,ता. काटोल** याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता काटोल पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



**आरोपी आनंद रामराव बोरकर**

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १७/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतानां गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पथकाने पोलीस स्टेशन **एमआयडीसी बोरी हद्दीत मौजा सालईदाभा शिवार येथे** नाकाबंदी केली असता **मारोती अर्टिका क्रमांक एम एच ४९ यु ८१२९** मिळुन हे वाहन मिळुन आले . सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. **वाहन चालक आरोपी नामे कुणाल विनोद धोटे, वय २४ वर्षे, रा नंदुरी,ता समुद्रपुर, जि. वर्धा हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष होला हुक्का शिशा कंपनीचा सुगंधित तंबाखू ,विमल पान मसाला, ट १ कंपनीचा सुगंधित तंबाखू, डबल ब्लॅक १८ कंपनीचा सुगंधित तंबाखू , राजश्री पानमसाला , डी.बी. सिग्नेचर पानमसाला, ब्लॅक लेबल १८ कंपनीचा सुगंधित तंबाखू असा एकुण किंमती १,४५,१०५ /—रूपये आणि मारोती अर्टिका क्रमांक एम एच ४९ यु ८१२९ किंमती .१०,००,०००/—रूपये असा एकुण ११,४५,१०५ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने